# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# भाजपा शहराध्यक्षपदी शत्रुघ्न काटे

## प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा : भाजपा पक्षश्रेष्ठीने शब्द पाळला

**पिंपरी | प्रतिनिधी**

भाजप चे माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या गळ्यात शहराध्यक्ष पदाची माळ पडली आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यासंदर्भात घोषणा केली. नुकताच झालेल्या विधानसभा निवडणुकीत चिंचवड विधानसभा मतदारसंघातून शत्रुघ्न काटे इच्छुक होते. पक्षातील नाराज पदाधिकाऱ्यांना हाताशी धरून मोट बांधण्याचा प्रयत्न केला होता. पक्षश्रेष्ठीने शत्रुघ्न काटे यांची समजूत काढून शहर कार्यकारी अध्यक्ष पद सोपवले होते.



दरम्यान, अध्यक्षपदाच्या शर्यतीत नामदेव ढाके यांच्यासह अनेक जण इच्छुक होते. परंतु, पक्षश्रेष्ठीने शत्रुघ्न काटे यांना शब्द दिल्याने अखेर त्यांना भाजप शहराध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले आहे. भाजप चे माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांची पिंपरी- चिंचवड शहराध्यक्षपदी निवड झाली आहे. महानगर पालिकेत तीन वेळेस काटे हे नगरसेवक म्हणून निवडून गेलेले आहेत. शत्रुघ्न काटे हे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे कट्टर समर्थक मानले जातात. परंतु, याच काटे यांनी चिंचवड विधानसभेच्या काळात आमदार शंकर जगताप यांच्या निवडणुकीच्या वाटेवर 'काटे' टाकण्याचा प्रयत्न केला.

माजी आणि नाराज नगरसेवकांची मोट बांधून त्यांनी शंकर जगताप यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. बंड करण्याचा इशारा दिला होता. स्वतः शत्रुघ्न काटे हे चिंचवड विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक होते. या प्रकरणानंतर पक्षश्रेष्ठीने शत्रुघ्न काटे यांची समजूत काढली होती. अखेर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मध्यस्थीने हे प्रकरण शांत करण्यात आलं होतं. काटे यांना शहराध्यक्ष पद देण्यात येईल असा शब्द देण्यात आला होता. अखेर तो शब्द भाजप पक्षश्रेष्ठीने पाळल्याचे पाहायला मिळत आहे.

# इंद्रायणीनगर येथे ऐतिहासिक वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन

## विलासभाऊ मडिगेरी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजन : गंगाआरती होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सवानिमित्त श्री साई चौक मित्र मंडळ, श्री विलासभाऊ मडिगेरी प्रतिष्ठान व श्री वैष्णोमाता मंदिर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऐतिहासिक वस्तूंचे भव्य प्रदर्शनाचे सोमवारी (दि.१२) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे विभाग संघचालक आप्पासाहेब गवारे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे यासर्वांच्या शुभहस्ते उद्घाटन संपन्न झाले.



भोसरी इंद्रायणीनगर येथील वैष्णोदेवी मंदिराच्या प्रांगणात १२ ते १४ मे २०२५ या कालावधीत होत असलेल्या ऐतिहासिक वस्तूंच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी शत्रुघ्न काटे (शहराध्यक्ष, भाजपा पिंपरी- चिंचवड), विलास मडिगेरी (माजी अध्यक्ष, स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड), पांडुरंग बलकवडे (चिटणीस भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे), बस्तीमलजी सोलंकी (भारतातील नामांकित नाणे संग्रह), विलास लांडगे (पुणे विभाग संयोजक स.ग. प्रांत मंडळ सदस्य), किरीट पटेल (गट कार्यवाहक आरएसएस), संतोष चंदने (श्री शिव शस्त्र गाथा ऐतिहासिक शिवकालीन शस्त्रात्र प्रदर्शन), कुमार गुरव (दर्यापती शिवराय जहाज प्रतिकृती प्रदर्शन), किरणकुमार करांडे (मराठा साम्राज्यातील नाणी संग्राहक), चंद्रकांत देशमुख, व्यंकटराव शिंदे, शिवकुमार अग्रे, नेताजी घारे, राजेंद्र जगताप, ओंकार हलगौडा संजय जगताप, धनंजय जाधव, हनुमंत पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

ऐतिहासिक वस्तूंचे प्रदर्शन तीन दिवस सकाळी १० ते सायंकाळी ९ वाजेपर्यंत खुले राहणार आहे. तीन दिवस रोज सायंकाळी ७.३० वाजता छत्रपती महाराज यांची महाआरती, प्रयागराज कुंभमेळा येथील गंगाजल कलश पूजन व गंगाआरती देखील होणार आहे. या मध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले आहे.

### पहिल्याच दिवशी विद्यार्थी-पालकांची प्रदर्शनाला भेट

**» प्रदर्शन सुरु झाल्यानंतर पहिल्या दिवशी परिसरातील विद्यार्थी, पालकांनी मोठ्या संख्येने प्रदर्शनाला भेट दिली. प्रदर्शनाला भेट देत छत्रपती शिवाजी महाराज धर्मवीर संभाजी महाराज यांची नाणी, स्वराज्याचे स्वाभिमानी चलन शिवराई. मराठा साम्राज्यातील नाणी, शिवकालीन शस्त्र, गौरवशाली मराठा आरमार याची माहिती अनेक जण जाणून घेत आहेत. तसेच, प्रदर्शनातील आरमारातील जहाज प्रतिकृती आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. शिवरायांचा इतिहासात समजून घेण्याची ही संधी मिळाल्याची भावना प्रदर्शन पाहून अनेकांनी व्यक्त केली.**

# पालिकेच्या उत्पन्नाला ठेवींचा आधार

## पुणे महापालिकेला ठेवींवरील व्याजापोटी मिळते 200 कोटींहून अधिक व्याज

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या गेल्या अनेक वर्षांपासून विविध बँकांमध्ये ठेवी आहेत. या ठेवी सुमारे पाच हजार कोटींच्या घरात गेल्या आहेत. महापालिकेवर गेल्या सव्वातीन वर्षांपासून प्रशासकराज असून, या कालावधीत बँकेतील ठेवी वाढल्या आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात महापालिकेला या ठेवींमधून २०१ कोटी ६३ लाखांचे व्याज मिळाले. २०२५-२६ या आर्थिक वर्षात ठेवींवरील २३० कोटींपेक्षा जास्त व्याज मिळणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नाला ठेवींचा आधार भेटला आहे.



कोरोना काळात मार्च २०२० पासून पुढील दोन वर्षे शहरातील विकासकामे ठप्प होती. महापालिकेच्या वित्तीय खर्चावर मर्यादा आणण्यासाठी शासनाकडून आयुक्त तथा प्रशासकाच्या अध्यक्षतेखाली वित्तीय समिती नेमण्यात आली. त्यामुळे केवळ आरोग्य विभागास खर्चाची मुभा होती, तर इतर विभागांना केवळ ३३ टक्केच खर्च करण्याचे बंधन होते. या काळात महापालिकेचे मिळकतकर, शासनाचे अनुदान, बांधकाम विकसन शुल्क यांचे उत्पन्न सुरू असल्याने महापालिकेकडे मोठ्या प्रमाणात निधी शिल्लक होता. हा निधी पालिकेकडून बँकेत ठेवींमध्ये ठेवण्यात आला.

राज्य सरकारकडून आलेला निधी अनेकवेळा महापालिका लगेच खर्च करीत नसल्याने हा निधीही बँकेत ठेवला जात असल्याने त्यावरही महापालिकेस घसघशीत व्याज मिळत आहे. महापालिकेने अर्थसंकल्पात ठरविलेल्या खर्चापेक्षा कमी खर्च होतो, त्यातून उत्पन्नाची मोठी रक्कम बचत होते. त्याच प्रमाणे महापालिकेकडून दरवर्षी सुमारे चार हजार कोटींपेक्षा जास्त रकमेच्या निविदा काढल्या जातात. त्यावेळी ठेकेदारांकडून अनामत रक्कम घेतली जाते. काम पूर्ण झाल्यानंतर ही रक्कम ठेकेदाराला दिली जाते. पण अनेकदा ही रक्कम वेळेत न दिल्याने ठेकेदारांना प्रशासनाकडे खेटे मारावे लागतात.

ठेकेदारांची ही रक्कम महापालिकेच्या तिजोरीत न ठेवता, ती बँकेत ठेव ठेवली जाते. त्यावर महापालिकेला व्याज मिळते. २०२०-२१ मध्ये महापालिकेस ठेवींवरील व्याजातून ८० कोटी ६१ लाखांचे उत्पन्न मिळत होते. त्यानंतर या उत्पन्नात वाढ झाली. पालिकेकडून दरवर्षी शिल्लक राहिलेले पैसे प्रत्येक सहा महिन्यांसाठी बँकेत ठेवले. या ठेवी सुमारे चार हजार कोटींच्या घरात गेल्या आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात महापालिकेस २०१ कोटी ६३ लाखांचे व्याज मिळाले होते. २०२५-२६च्या पालिकेच्या अंदाजपत्रकात व्याजातून २३० कोटींचे व्याजाचे उत्पन्न गृहीत धरण्यात आले आहे.

### दरवर्षी चार हजार कोटींहून अधिक रकमेच्या निविदा...

» शहरात विविध विकासकामे केली जातात. त्यासाठी महापालिकेकडून दरवर्षी सुमारे चार हजार कोटींपेक्षा जास्त रकमेच्या निविदा काढल्या जातात. त्यावेळी ठेकेदारांकडून अनामत रक्कम घेतली जाते. काम पूर्ण झाल्यानंतर ही रक्कम ठेकेदाराला परत दिली जाते. पण अनेकदा ही रक्कम वेळेत न दिल्याने ठेकेदारांना प्रशासनाकडे खेटे मारावे लागतात. ठेकेदारांची ही रक्कम महापालिकेच्या तिजोरीत न ठेवता, ती बँकेत ठेव ठेवली जाते. परिणामी महापालिकेला त्यावरील व्याज मिळत राहते.

# कोणत्याही परिस्थितीत रुग्णांचे मृतदेह अडवू नका!

## सर्व खासगी रुग्णालयांना महापालिकेची तंबी : आरोग्य विभागाची गंभीर दखल

**पुणे | प्रतिनिधी**

खासगी रुग्णालयांनी देयकासाठी रुग्णांचे मृतदेह अडवून ठेवल्याच्या दोन घटना नुकत्याच घडल्या होत्या. याची महापालिकेच्या आरोग्य विभागाने गंभीर दखल घेतली आहे. आरोग्य विभागाने शहरातील सर्व रुग्णालयांना पत्र पाठविले असून, कोणत्याही कारणास्तव रुग्णाचा मृतदेह अडवून ठेवू नये, अशी सक्त ताकीद दिली आहे. याचबरोबर असा प्रकार आढळल्यास कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे.



शहरातील दोन खासगी रुग्णालयांनी देयकासाठी रुग्णांचे मृतदेह अडवून ठेवल्याच्या घटना घडल्या होत्या. या दोन्ही रुग्णालयांना महापालिकेच्या आरोग्य विभागाने नोटीस बजावली होती. अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी आरोग्य विभागाने पावले उचलली आहेत. आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी शहरातील सर्व खासगी रुग्णालयांना पत्र पाठविले आहे. त्यात बॉम्बे नर्सिंग होम कायदा १९४९ आणि महाराष्ट्र नर्सिंग होम कायदा २०२१ चे काटेकोर पालन करण्याचे निर्देश खासगी रुग्णालयांना देण्यात आले आहेत.

आरोग्य विभागाने रुग्णालयांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, खासगी रुग्णालयांनी रुग्णांसोबत सौजन्यपूर्ण वर्तन करणे आवश्यक आहे. गंभीर रुग्णांच्या आर्थिक स्थितीचा विचार न करता त्यांना प्राधान्याने आरोग्य सेवा देणे अपेक्षित आहे. एखाद्या रुग्णाचा मृत्यू झाल्यास आवश्यकतेनुसार न्यायवैद्यक प्रक्रिया पूर्ण करून नातेवाइकांच्या ताब्यात मृतदेह द्यावा. कोणत्याही परिस्थितीत देयक भरले नाही म्हणून अथवा अन्य कारणास्तव रुग्णाचा मृतदेह रुग्णालयाला रोखून धरता येणार नाही. या सूचनांचे काटेकोर पालन रुग्णालयांनी करावे.

### तज्ज्ञांचे मत काय?

» महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी कायद्यातील कलम ११ एलनुसार कोणत्याही रुग्णालयाला कोणत्याही कारणास्तव रुग्णाचा मृतदेह अडविता येत नाही. या कायद्यात पैशांअभावी मृतदेह अडवून ठेवू नये, अशी स्पष्ट तरतूद आहे. याचेच पालन सध्या रुग्णालयांकडून होताना दिसत नाही. त्यामुळे राज्य सरकारने अशा रुग्णालयांच्या व्यवस्थापनावर कठोर कारवाई करावी. याचबरोबर प्रत्येक शहरात वैद्यकीय तक्रार निवारण कक्ष असणे आवश्यक आहे. त्याची माहिती सर्वांपर्यंत पोहोचवून त्या माध्यमातून आलेल्या तक्रारींचे निवारण सरकारी यंत्रणेने करणे बंधनकारक आहे. ते सध्या कोठेही होताना दिसत नाही, असे मत जनस्वास्थ्य अभियानाचे संयोजक डॉ. अभय शुक्ला यांनी व्यक्त केले.

# नागरिकांच्या जिवापेक्षा अधिकाऱ्यांना होर्डिंग्जधारकांची काळजी

## होर्डिंगवरील जाहिराती उतरविण्याची मुदत घटविली : आकाशचिन्ह विभागाचा अजब कारभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

वादळी वारे आणि अवकाळी पावसामुळे होर्डिंग कोसळून दुर्घटना होऊ नये, यासाठी खबरदारी म्हणून पिंपरी-चिंचवड महापालिकेने १५ मे ते १५ जून, असे दोन महिने सर्व होर्डिंग्जवर जाहिरात न लावता, ती रिकामी ठेवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्याला होर्डिंग्जधारकांनी फारसा प्रतिसाद दिला नाही. वारंवार आवाहन करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने महापालिकेने निर्णय फिरवला आहे. आता २५ मे ते ७ जून अशा १४ दिवसांसाठी हा निर्णय मर्यादित करण्यात आला आहे. उद्योगनगरीतील नागरिकांच्या जिवापेक्षा अधिकाऱ्यांना होर्डिंग्जधारकांचीच काळजी असल्याचे दिसत आहे.



शहरातील जाहिरात होर्डिंग्जचालक व धारक आणि आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक ९ एप्रिलला झाली. वादळी वारे, अवकाळी पावसामुळे होर्डिंग कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यात जीवित व वित्तहानी होऊ शकते. त्यामुळे पावसाळ्यापूर्वीच्या १५ एप्रिल ते १५ जून, असे दोन महिने होर्डिंगवर जाहिरात बॅनर न लावण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. त्या काळात होर्डिंग रिकामे ठेवण्यात येणार होते. त्या निर्णयास होर्डिंगचालकांनी सहमती दिली होती. मात्र, त्या मुदतीमध्ये शहरातील बहुतांश होर्डिंग्जवर जाहिरात झळकत आहेत.

गृहप्रकल्प, राजकीय नेते, कार्यक्रम, निमंत्रण पत्रिका, क्रीडा स्पर्धा, वाढदिवसाच्या शुभेच्छा अशा जाहिराती झळकत आहेत. त्याबाबत महापालिकेवर टीका झाल्यानंतर आकाशचिन्ह व परवाना विभागाने होर्डिंगचालकांची उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी बैठक घेतली. या काळात होर्डिंगवरील जाहिरातीसाठी मोठे उत्पन्न मिळते. त्यामुळे जाहिरात न लावल्यास उत्पन्न बुडते, असा सूर त्यांनी आळवला. त्याला सहमती देत मुदत केवळ दोन आठवड्यांवर आणण्यात आली आहे. २५ मे ते ७ जून या १४ दिवसांत होर्डिंगवर जाहिराती न लावता ते रिकामे ठेवले जातील, असा निर्णय घेण्यात आला आहे.

### होर्डिंगचालकांचे नुकसान होऊ नये म्हणून दक्षता

» जोरदार वादळी वाऱ्यामुळे लोखंडी जाहिरात होर्डिंग कोसळून शहरात असंख्य दुर्घटना घडल्या आहेत. वादळी वाऱ्यामुळे किवळे येथील जाहिरात होर्डिंग कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला. तर, तीनजण जखमी झाले होते. ती दुर्घटना १७ एप्रिल २०२३ ला घडली. शहरात अनेक ठिकाणी होर्डिंग कोसळून दुकान, टपऱ्या व वाहनांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून महापालिकेने पावसाच्या सुरुवातीस दोन महिने होर्डिंगवर जाहिराती न लावण्याचा निर्णय घेतला. मात्र, होर्डिंगचालक, धारक व जाहिरात एजन्सीचालकांचे उत्पन्न बुडू नये, म्हणून तो कालावधी केवळ १४ दिवसांवर आणण्यात आला आहे. होर्डिंगचालकांच्या दबावामुळे महापालिकेने निर्णय फिरवल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

> दोन महिन्यांच्या काळात जाहिरातीद्वारे मोठे उत्पन्न मिळते. त्यामुळे तो कालावधी कमी करण्याची विनंती होर्डिंगचालकांनी केली. त्यानुसार पावसाळ्यापूर्वीच्या दोन आठवड्यांच्या काळात होर्डिंग रिकामे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्या काळात होर्डिंगवर जाहिराती लावल्यास कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग, महापालिका.**

# पुणे-पिंपरी-चिंचवडकरांसाठी फॅशन, फन, फूड-सगळं एकाच ठिकाणी!

## बालेवाडीत दोन दिवसीय "समर शॉपिंग अँड फूड फेस्टिवल"चे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या सुट्यांचा आनंद घेण्यासाठी आणि शॉपिंगसोबत खाद्यप्रेमींसाठी एक खास पर्वणी ठरणारा "समर शॉपिंग अँड फूड फेस्टिवल" बालेवाडीत १७ आणि १८ मे २०२५ रोजी आयोजित करण्यात येत आहे. संध्याकाळी ४ वाजता सुरू होणारा हा फेस्टिवल रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहणार असून, बालेवाडीत दोन दिवस खरेदी, खवय्यांसाठी विविध पदार्थांची चव आणि कुटुंबांसाठी करमणुकीचा मनसोक्त अनुभव मिळणार आहे.




बालवाडीत १७ आणि १८मे दरम्यान "समर शॉपिंग अँड फूड फेस्टिवल"चे आयोजन करण्यात आले आहे. . या ठिकाणी एकाच छताखाली सर्वांना आवडणाऱ्या आणि परवडणाऱ्या वस्तू खरेदी करता येणार आहेत. हा फेस्टिव्हल बालवाडी येथील, दसरा चौकातील, आठवडे बाजार ग्राउंडवर दुपारी ४.०० ते रात्री १० वाजेपाट्यांत पर्यंत सर्वांसाठी खुला असणार आहे. बाणेर-बालेवाडीकरांना मनसोक्त खरेदी आणि लज्जतदार पदार्थांची मेजवानी एकाच छताखाली दोन दिवस मिळणार आहे.

महिलांच्या उत्पादनांना प्रोत्साहन...

अश्या या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वतःचा व्यवसाय सुरु करणाऱ्या महिला आणि व्यावसायिकांना एकत्र करत ग्रीन ॲपल एक्सहिबिशन हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. तसेच व्यवसायावर असणाऱ्या कुटुंबांना आपल्या स्थानिक पातळीवरील उद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांना हातभार लावण्याचेही काम ग्रीन ॲपल एक्सहिबिशन करत आहे. हिंजवडी आय. टी. जवळील बाणेर बालेवाडी परिसर आय. टी. रेसिडेन्स हब म्हणून झपाट्याने विकसित झाला आहे. या परिसरातील लोकांच्या रोजच्या जीवनातील गरज लक्षात घेऊन बाणेर-बालेवाडीकारणांसाठी खास संक्राती शॉपिंग फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिवलच्या माध्यमातून व्यावसायिकांसाठी बाणेर-बालेवाडी परिसरात बिझिनेझ प्रोमोट करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. आपणही आपला बिझनेस या लोकांपर्यंत या फेस्टिवलच्या माध्यमातून पोहचवू शकता. तसेच या पुढेही ऑनलाईन सेवा देऊ शकता तरी या फेस्टिवल मध्ये सहभागी होण्यासाठी ९८५०३०४१६६ या नंबर वर संपर्क करावा.

### लहान मुलांसाठी खास आकर्षण...

» या फेस्टिव्हल मध्ये लहान मुलांसाठी खास आकर्षण असणारे लांब पायाचे स्टिल्ट वॉकर, आणि जोकर यांची लहान मुलांच्या करमणुकीसाठी तसेच जम्पिंग आणि किड्स बॉऊन्सिंग असणार आहे. त्याच बरोबर थोरामोठांसाठी "ये शाम मस्तानी" हा सदाबहार गाण्यांचा प्रोग्रॅमही असणार आहे.

### समर शॉपिंग फेस्टिवलमध्ये काय?

» या "समर शॉपिंग फेस्टिवल" मध्ये प्रामुख्याने पैठणी, शोभेच्या वस्तू, ज्वेलरी, पंजाबी सूटस, प्लाझो, फाब्रिक डिझाईनर साड्या, रेडी टू वेअर ब्लाऊज, लॉन्ग आणि शॉर्ट कुर्तीज, कॉटन मेन्स शर्ट्स आणि किड्स वेअर, लहान लहान मुलांसाठी लाकडी खेळणी बेडशीट, सुगंधी हॅन्डमेड सोप, ब्युटी प्रॉडक्ट्स, ऑरगॅनिक प्रॉडक्ट, शोभेच्या वस्तू, महिला बचत गटांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तू, लोणच्यांचे विविध प्रकार, दर्जेदार गावरान आणि घरगूती मसाले, पापड कुर्डाई, शोभेच्या वस्तू, रेडी टू कुक फूड्स, मातीची भांडी, होम डेकोरच्या वस्तू, असे स्टॉल असणार आहेत. या परिसरातील लोक मोठ्या संख्येने या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलला भेट देत असतात.

# इंदापूरला रोजगार हमी योजना उरली घरकुल

## मजुरांअभावी कामे बंद पडण्याच्या मार्गावर : योजनेत मिळणारी हजेरीही तुटपुंजी

**पुणे | प्रतिनिधी**

रोजगार हमी योजनेत मिळणारी हजेरी व शेतमजुरीतील हजेरीत असणारी तफावत, जीपीएस प्रणालीमुळे शासकीय दरात राबण्यापेक्षा शेतात मजुरी करणे बरे या विचारामुळे रोजगार हमीच्या कामापासून मजूर दुरावला जात आहे. त्यातच रस्त्यांची कामे यंत्राद्वारे करावीत, की मजुरांमार्फत करून घ्यावीत हा प्रश्न निर्माण झाल्याने रोजगार हमीची कामे फक्त घरकुल व विहिरींच्या कामांपुरतीच मर्यादित राहिली आहेत. रोजगार हमीची इतर कामे मजुरांअभावी बंद पडत चालली आहेत, असे इंदापूर तालुक्यातील चित्र आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मागील काळात सार्वजनिक व वैयक्तिक लाभाची अनेक कामे होत होती. मात्र, अनिष्ट प्रवृत्तींना आळा बसावा, राबणाऱ्या हाताला मोबदला मिळावा या उद्देशाने शासनाने जीपीएस प्रणालीचा उपयोग करण्यास सुरुवात केली. त्याचा पहिला फटका वृक्ष संवर्धनाच्या कामांना बसला. जीपीएस प्रणाली बसविण्याआधी आठवड्यातून एक दोन वेळा गेले, झाडांना पाणी दिले, भोवतालचे तण काढले तरी भागत असायचे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मागील काळात सार्वजनिक व वैयक्तिक लाभाची अनेक कामे होत होती. मात्र, अनिष्ट प्रवृत्तींना आळा बसावा, राबणाऱ्या हाताला मोबदला मिळावा या उद्देशाने शासनाने जीपीएस प्रणालीचा उपयोग करण्यास सुरुवात केली. त्याचा पहिला फटका वृक्ष संवर्धनाच्या कामांना बसला. जीपीएस प्रणाली बसविण्याआधी आठवड्यातून एक दोन वेळा गेले, झाडांना पाणी दिले, भोवतालचे तण काढले तरी भागत असायचे.



प्रणाली बसवल्यानंतर सकाळी हजेरी सुरू होत असताना व संध्याकाळी कामावरून सुटण्याआधी असे दोन फोटो काढणे बंधनकारक झाले. जो काम करतो त्याच मजुराचा फोटो व कामाचा तपशील द्यावा लागू लागला. परिणामी संबंधित मजुराला तेथे काम करणे ॥ अपरिहार्य होऊन गेले. कमी हजेरीत राबण्याऐवजी मजूर शेतात मजुरी करायला जाऊ लागले.विजयकुमार परीट गटविकास अधिकारी असताना गायगोठ्याची बरीच प्रकरणे मंजूर झाली होती. ती पूर्ण झाली नाहीत. सुरुवात झाली, एक दोन मस्टर निघाले.

काही लोकांचे प्रस्ताव मंजूर झाले. त्या काळात त्या विभागात कार्यरत असणाऱ्या एका लिपिकाने अर्थपूर्ण तडजोडी करून काही प्रस्तावांना मंजुरी दिली होती. ती कामे त्या विभागातील ऑनलाइन प्रणालीला अपूर्ण असल्याचे दिसत आहे. ती कामे पूर्ण करण्याची जबाबदारी आताचे गटविकास अधिकारी व लिपिकाकडे आहे. ती पूर्ण झाल्याखेरीज गायगोठ्याच्या नवीन प्रस्तावांना मंजुरी देता येत नाही, हेही त्रांगडे होऊन बसलेले आहे.

या आधी रोजगार हमी योजनेंतर्गत पुरुष व महिला मजुराला २९७ रुपये हजेरी मिळत होती. ती आता ३१८ रुपये करण्यात आली आहे. शेतमजुरी करणाऱ्या पुरुषाला ७०० व महिलेस ५०० रुपये हजेरी मिळते. त्या हिशेबाने पुरुषाला ३८२, तर महिलेला १८२ रुपये कमी मिळतात. ही तफावत दूर करणे, रस्त्यांच्या कामांमधून काटेकोरपणे यंत्रे हद्दपार करुन मजुरांच्या हाताला काम देणे हे धोरण शासनाने राबवले तर रोजगार हमीवरच्या कामांवरील मजुरांची संख्या वाढेल.

### बोगस हजेरीपत्रके भरून घेण्याचा सपाटा

**» रस्त्यांची कामे थोडक्या कालावधीत कमी श्रमात पूर्ण करून घेण्याचा घाट ग्रामपंचायतींनी घातला. संबंधित सरपंच, उपसरपंच व त्यांच्या मार्गदर्शकांनी शासकीय कर्मचाऱ्यांना हाताशी धरून रात्रीच्या वेळी यंत्राने कामे करून घेत, मजुरांची बोगस हजेरीपत्रके भरून घेण्याचा सपाटा लावला. त्या कामांच्या माध्यमातून मजुरांना मिळणारी रक्कम आपसात वाटून घेण्याचे प्रकारही वाढले. यातून नफा मिळवणाऱ्या 'समाजसेवकांचा' वर्ग जागा झाला. रात्रीस चाललेली अशी कामे शोधायची. त्यांचे चित्रीकरण करायचे. ऑनलाइन तक्रार करण्याची धमकी देऊन 'त्या' पैशात वाटेकरी व्हायचे असा प्रकार होऊ लागला. काही ठिकाणी तक्रारीही झाल्या. त्यातून रस्त्याच्या कामांची हजेरी ही मजुरांच्या नावाने निघत असल्याने मजूर आणायचे कोठून हा प्रश्न पुढे आला.**

> “ सध्या इंदापूर तालुक्यात घरकुल योजना व विहिरींची कामे रोजगार हमीमधून चालू आहेत. घरकुलांचे लाभार्थी आपल्याच घराच्या कामासाठी मजुरी करत आहेत. सध्या घरकुलाची ४३० कामे सुरू आहेत. त्यावर २१५० मजूर काम करत आहेत. विहिरींची ३० कामे सुरू आहेत. त्यावर ४५० मजूर काम करत आहेत.
>
> **- विनोद शिंद, तांत्रिक अधिकारी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना विभाग, इंदापूर पंचायत समिती.**

# 'विघ्नहर'कडून 9 लाख 3 हजार 711 मेट्रिक टन ऊस गाळप

## सत्यशील शेरकर यांची माहिती : विघ्नहर कारखाना तब्बल 167 दिवस चालला

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा सन 2025-26चा गळीत हंगाम संपला असून यंदाचा हंगाम 167 दिवस सुरू राहिला. या काळात कारखान्याने यंदाच्या वर्षी 9 लाख 3 हजार 711 मेट्रीक टन उसाचे गाळप केले. त्यापासून 9 लाख 91 हजार 101 साखर पोती उत्पादित झाल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी दिली.



शेरकर म्हणाले, यंदा विघ्नहर कारखाना तब्बल 167 दिवस चालला. शासनाच्या धोरणामुळे साखर कारखाने उशिरा सुरू झाले तसेच आपल्या कारखान्याचे विस्तारीकरण झाल्यामुळे 1 लाख 46 हजार मेट्रीक टन ऊस बाहेरच्या कारखान्याला देण्यात आला. कारखान्याच्या विस्तारीकरणामुळे यंदा ऊसतोडणी काही प्रमाणात उशिरा झाली.

त्यामुळे ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांना मनस्ताप झाला. परंतु कारखान्यावर असलेले प्रेम व आमच्या नेतृत्वावर असलेला विश्वास यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी समजून घेत सहकार्य केले. पुढील वर्षी सर्व उसाचे गाळप वेळेवर होईल. कारखान्याकडे पुरेसा ऊस असला तरी गेटकेन ऊससुद्धा उपलब्ध केला जाईल.

कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार दिवंगत निवृत्तीशेठ शेरकर यांच्या मार्गदर्शक धोरणानुसार आम्ही संचालक मंडळ काम करीत असून कारखान्याचे सभासद व ऊस उत्पादक शेतकरी यांच्या हिताचा नेहमीच विचार केला जातो. खर्च वजा जाता उर्वरित रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्याचा नेहमीचाच प्रयत्न राहिलेला आहे.

कारखान्याचे कार्यकारी संचालक भास्कर घुले, सचिव अरुण थोरवे, शेतकी अधिकारी सचिन पाटील, अभियंता बाळासाहेब शिंदे यांच्यासह चीफ केमिस्ट, सर्व कर्मचारी व ऊस तोडणी मजूर या सर्वांच्या सहकार्यामुळे गळीत हंगाम यशस्वीपणे पूर्ण करू शकलो. कारखान्याकडे नोंदलेल्या सर्व उसाची तोडणी देखील केली.

कारखान्याचे सभासद हे कारखान्याचे मालक असून आम्ही विश्वस्त मंडळी त्यांच्या विश्वासाला नेहमीच पात्र राहण्याचा प्रयत्न करीत असतो. यंदाच्या वर्षी विघ्नहर कारखान्याची निवडणूक पार पडली. सभासदांनी आमच्यावर विश्वास व्यक्त करून कारखान्याची सत्ता एकहाती आमच्या हाती दिली. सभासदांचा आमच्यावर असलेला विश्वास याचा मला नेहमीच अभिमान असल्याचेही अध्यक्ष शेरकर यांनी यावेळी नमूद केले.